दै. देशोन्नती दि. 23/01/25

# लघुशंकेचा बहाणा करून दोन गुटखा तस्कर पोलिसांच्या ताब्यातून फरार

## स्विफ्ट डिझायरसह तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**मांडवी :** प्रतिबंधित गुटख्याने भरलेली स्विफ्ट डिझायर कार २० जानेवारीच्या रात्री मांडवी पोलिसांनी पकडली. त्यातील दोन आरोपींना चौकशीसाठी मांडवी पोलीस ठाण्यात आणले असता लघुशंकेचा बहाणा करून अंधारात पसार झाल्याने पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

नेहमीप्रमाणे तेलंगणातून मराठवाड्यात गुटख्याची तस्करी करणारी स्विफ्ट डिझायर कार येत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून सपोनि गफार शेख यांच्या आदेशाने पिंपळगाव फाटा येथे पोहेकॉ प्रकाश अस्वले, पोलीस कॉ. श्याम चव्हाण, मनिष ठाकरे, अर्जुन पवार यांनी नाकाबंदी केली. त्यांना पहाटे ४ वाजता आदिलाबादकडून भरधाव वेगात स्विफ्ट डिझायर येत असल्याचे दिसून



आले. यावेळी सदर वाहनास थांबविण्यासाठी बॅरीकेट्स लावले असता सदर गाडी फिरून आदिलाबादकडे परत निघाली. तेव्हा संशय आल्याने त्या गाडीचा पाठलाग करत तेलंगणाच्या लक्ष्मीपूर चेक नाका येथे थांबवून गाडी क्र.एम.एच. -१२- के.एम. -३८१७ या गाडीला ताब्यात घेतले.

गाडीतील चालक अजगर अहमद फकीर मोहमद सोबत शरीक नूर मोहंमद दोघे रा. सोनपीर दर्गा माहूर यांना ताब्यात घेऊन वाहनाची पाहणी केली असता गाडीत गुटखा असल्याचे आढळले. गुटखा कोणाचा आहे? असे विचारले असता बाबर अहमद फकीर मोहमद रा. माहूर यांचे असल्याचे त्यांनी सांगितले. सदर गाडीतील मुद्देमाल चौकशीसाठी पोलीस स्टेशन येथे आणला असता मुद्देमालची पाहणी करत असताना दोघे आरोपी लघुशंकेला जातो म्हणून अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. यामध्ये पोलिसांनी विविध कंपन्यांचा ७० हजार १०४ रुपये किमतीचा गुटखा व वाहन असा एकुण ३ लाख १०४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

**फरार दोन्ही आरोपींना लवकरच ताब्यात घेऊ - सपोनि गफार शेख**

या बाबत मांडवीचे सपोनि गफार शेख यांना विचारले असता फरार आरोपींचा शोध सुरू असून दृष्टिक्षेपात असलेले दोन्ही आरोपी व त्यांच्या म्होरक्याला लवकरच ताब्यात घेऊ, असे सांगितले.

दै. प्रजावाणी

# अवैध रेतीउपसा व वाहतूक करणारे दोघे वाहनांसह पोलिसांच्या ताब्यात

**वार्ताहर • मारतळा**

लोहा तालुक्यातील येळी येथील रेतीघाटावरून रेतीचा विनापरवाना उपसा करून अवैध वाहतूक करणाऱ्या दोघा जणांना पोलिसांनी वाहनांसह ताब्यात घेतले असून उस्माननगर पोलीस ठाण्यात या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हा शाखा, नांदेडचे पथक २१ जानेवारी रोजी रात्री गस्तीवर असताना वाका फाटा येथे आले होते. त्यावेळी त्यांना येळी फाटा रस्त्यावर रेतीची टिप्परद्वारे अवैध वाहतूक होत असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाली. त्यावरून पोलिसांनी पाहणी सुरू केली असता मारतळा ते कहाळा रोडवर टाटा कंपनीचे दोन टिप्पर क्रमांक एमएच २२ एए ३६६६ व एमएच २६ बीई १५५२ पोलिसांना अवैध वाहतूक करताना आढळले. या वाहनांवर चालक म्हणून असलेले परमेश्वर हनमंत पवार (२४) रा. हंगरगा ता. उमरी व नागोराव धोंडिबा गाढे (३०) रा. बळेगाव ता. उमरी या दोघांना वाहनांसह ताब्यात घेण्यात आले. गौणखनिजाची अवैध व रॉयल्टीशिवाय वाहतूक केल्याप्रकरणी त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. दोन टिप्परची किंमत अंदाजे ८ लाख रूपये व त्यामध्ये प्रत्येकी ३-३ ब्रास असलेली रेती, तिची किंमत अंदाजे ३० हजार असा एकूण ८ लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक आनंद बिचेवार, विश्वनाथ देवीदास पवार, मारोती मोरे आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

पोलिसांच्या दक्षतेमुळे अवैध वाहतूक करणाऱ्या या दोन वाहनांना ताब्यात घेण्यात आले असले तरी अनेकवेळा रेतीचा विनापरवाना उपसा व अवैध वाहतूक करण्याचे अनेक प्रकार अंधाऱ्या रात्री घडत असतात. त्याकडेही लक्ष देण्याची मागणी होत आहे.